**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ , कोल्हापूर - 416004.**

---

**परिपत्रक क्र - कोविमं./उमा (इ.12वी)/आवेदनपत्र/जून-जुलै 2026/** 1715 **दि.** 15 **/05/2026**

**विषय** -जून-जुलै 2026 मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने भरताना घ्यावयाच्या महत्वाच्या सूचनांबाबत.

**संदर्भ** - 1.क्र.रा.मं./परीक्षा-3/1861 दि. 04/05/2026 चे पत्र
2.क्र.कोविमं/12 वी परीक्षा/1590 दि. 05/05/2026 चे पत्र

या परिपत्रकान्वये कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यक्षेत्रातील सर्व उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालय प्रमुख यांना सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचेमार्फत जून-जुलै 2026 मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) परीक्षेच्या नियमित, व्यवसाय अभ्यासक्रम घेणारे विद्यार्थी, पुर्नपरीक्षार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी, तसेच श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय, ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेव्दारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी) चे विषय घेवून प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने भरण्याबाबत उपरोक्त संदर्भिय पत्रानुसार तारखा जाहीर झालेल्या आहेत.

**विद्यार्थ्यांची आवेदनपत्र अपलोड करताना खालीलप्रमाणे सूचनांचे पालन करावे.**

1. आवेदनपत्र अपलोड करताना विद्यार्थ्यांचे संपूर्ण नांव/आईचे नांव व जन्म तारखेची नोंद व इतर माहिती जनरल रजिस्टर वरील नोंदीप्रमाणेच अचूक भरावी.
2. ऑनलाईन आवेदनपत्र भरतांना विद्यार्थी प्रकारानुसार खालीलप्रमाणे आवेदनपत्र क्रमांक देण्यात यावेत.

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचा प्रकार | आवेदनपत्र क्रमांक |
|---|---|---|
| 1 | नियमित विद्यार्थी | 0001 ते 5000 |
| 2 | पुनर्परीक्षार्थी विद्यार्थी | 5001 ते 6000 |
| 3 | खाजगी विद्यार्थी | 6001 ते 7000 |
| 4 | श्रेणी सुधार विद्यार्थी | 7001 ते 8000 |
| 5 | तुरळक विद्यार्थी | 8001 ते 9000 |
| 6 | योग्यता प्रमाणपत्र प्राप्त विद्यार्थी | 9001 ते 10000 |

उपरोक्त प्रमाणे विद्यार्थ्यांच्या आवेदनपत्रास क्रमांक देताना प्रथम विज्ञान शाखेचे, त्यानंतर कला शाखेचे व त्यानंतर वाणिज्य शाखेचे असे सलग क्रमांक देण्यात यावेत. ऑनलाईन आवेदनपत्र क्रमांक दिल्यानंतर आवेदनपत्र पत्र क्रमांक Edit करता येत नाही. आवेदनपत्र अपलोड केल्यानंतर Edit करण्याचा प्रयत्न केल्यास एकाच विद्यार्थ्याची दोन वेळा नोंद होवून परीक्षा शुल्काची रक्कम नियमांनुसार कनिष्ठ महाविद्यालयास दोनदा भरावी लागेल. तसेच सदर एक आवेदनपत्र रद्द करण्याकरिता मंडळ नियमांनुसार पुन:श्च रुपये 500/- भरावे लागेल. तरी आवेदनपत्र क्रमांक अचूक भरण्यात यावे.

3. आवेदनपत्रात विद्यार्थ्याचा विषय कोड क्रमांक क्रमवार नोंदवावेत, उत्तर लेखनाची भाषा (Language of Ans. Code No.) व इतर माहिती भरताना योग्य कोड नंबर अचूक नमूद करण्यात यावा.
4. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात मान्यता असलेल्या शाखा/विषय/माध्यमानुसारच विषय घेणे आवश्यक आहे.
5. पर्यावरण शिक्षण (EVS) (विषय कोड क्र.-31) व आरोग्य व शारीरिक शिक्षण (PT) (विषय कोड क्रमांक -30) या ग्रेड विषयास आवेदनपत्रामध्ये माध्यम कोड क्रमांक नमूद केला जात नाही असे निदर्शनास आलेले आहे. तरी माध्यमाचा कोड क्रमांक न चुकता नमूद करावा.
6. पुर्नपरीक्षार्थी विद्यार्थी सर्व विषय घेवून प्रविष्ठ होत असल्यास पर्यावरण शिक्षण (EVS) आरोग्य व शारीरिक शिक्षण (PT) या विषयात प्रविष्ठ दर्शविण्यात यावे व Non Exempted चा कोड देण्यात यावा.
7. पुर्नपरीक्षार्थी विद्यार्थी पूर्वीची विषय सूट घेणार असल्यास त्याच्या सर्व गुणपत्रिका तपासून ज्या विषयात सुट आहेत त्या विषयात सूट नमूद करावी व Claimed Total No. of Exemptions दर्शविण्यात यावा.
8. नियमित खाजगी विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र भरताना ज्या विद्यार्थ्यांना मंडळाकडून नांव नोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate) प्राप्त झाले आहेत अशाच विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र ऑनलाईन भरण्यात यावेत तसेच खाजगी पुर्नपरीक्षार्थी विद्यार्थ्यांचे आवेदनपत्रात यापूर्वीच्या नांव नोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate) वरील क्रमांकाची अचूक नोंद करावी.
9. जे नियमित विद्यार्थी परराज्यातून / परदेशातून आलेले आहेत अशा विद्यार्थ्याची योग्यता प्रमाणपत्र (Eligibility Certificate) मंडळाकडून प्राप्त झालेले आहेत त्यांचा क्रमांक आवेदनपत्रात अचूक नमूद करावा व ज्याचे (Eligibility Certificate) मंडळाकडून प्राप्त झालेले नाहीत अशा विद्यार्थ्यांचे योग्यता प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय परीक्षेचे आवेदनपत्र भरण्यात येवू नये. त्यासाठी योग्यता प्रामाणपत्राची कार्यवाही विहित मुदतीत करुन घ्यावी.
10. एखाद्या विद्यार्थ्यांस चुकीचा नांव नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक (Enrollment Certificate) व योग्यता प्रमाणपत्र क्रमांक (Eligibility Certificate) देवून आवेदनपत्र अपलोड केल्याचे निदर्शनास आल्यास मंडळ नियमानुसार कडक कारवाई केली जाईल याची नोंद घ्यावी.
11. दिव्यांग विद्यार्थ्याचा दिव्यांग प्रवर्गानुसार मंडळाने निर्धारित केलेला दिव्यांग कोड आवेदनपत्रात अचूक नमूद करावा. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील दिव्यांग विद्यार्थ्यांचे परिपूर्ण प्रस्ताव मंडळाकडे त्वरित पाठवावेत. सदर प्रस्ताव मंडळात उशिरा सादर केल्याने विद्यार्थ्यास संबंधित सवलती न मिळाल्यास सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.
12. मंडळाचे दिव्यांग सवलतीचे पत्र प्राप्त झाल्यानंतर सदरचे पत्र कायम अभिलेख म्हणून कनिष्ठ महाविद्यालयात जतन करावे. सदरच्या दिव्यांग विद्यार्थ्यांपैकी पुर्नपरीक्षार्थी म्हणून प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पूर्वी प्राप्त सवलतीच्या पत्राची प्रत मंडळात सादर करावी. पुन:श्च प्रस्ताव सादर करण्यात येवू नये.
13. चलन,विद्यार्थी यादी आणि प्रिलिस्ट संबंधित वितरण केंद्रावर विहित मुदतीत जमा न केल्यास मंडळ नियमानुसार प्रतिदिन रु.200/- दंडात्मक शुल्क आकारण्यात येईल.
14. चुकीचे अथवा गैरप्रकार करुन आवेदनपत्र भरुन मंडळास पाठविल्यास मंडळ नियमानुसार प्रति विद्यार्थी रु.1000/- दंडात्मक शुल्क आकारण्यात येईल.

**श्रेणी / गुणसुधार (Class Improvement Scheme) साठी विशेष सूचना**

1. फेब्रु 2025, जून-जुलै 2025, व फेब्रु-2026 मध्ये प्रथम नोंदणी करुन परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या नियमित विद्यार्थ्यांना त्यांची संपादणूक सुधारण्यासाठी श्रेणी / गुणसुधार (Class Improvement Scheme) योजनेअंतर्गत परीक्षेस पुन:श्च प्रविष्ठ होण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. मार्च 2025 साठी प्रथमच प्रविष्ठ झालेल्या नियमित विद्यार्थ्यांना श्रेणी / गुणसुधार (Class Improvement Scheme) साठी जून-जुलै **2026 ही परीक्षा अंतिम संधी असेल. त्यामुळे त्यापूर्वीचे असे उत्तीर्ण विद्यार्थी अथवा कोणताही पुर्नपरीक्षार्थी विद्यार्थी यांना श्रेणी सुधार योजनेतंर्गत परीक्षेस प्रविष्ठ होता येणार नाही याची कटाक्षाने नोंद घ्यावी**.
2. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातून श्रेणीसुधार योजनेअंतर्गत प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची श्रेणीसुधार योजनेच्या नियमानुसार प्रथम प्रविष्ठ झालेल्या परीक्षेच्या मूळ गुणपत्रिकेतीलच सर्व विषय व माध्यम विद्यार्थ्यास घेणे आवश्यक असल्याने त्याची खात्री करुनच आवेदनपत्र अपलोड करावे. अशा विद्यार्थ्यांचा CIS Code (04) आवश्यक असून जर चुकून नियमित विद्यार्थ्याचा कोड नमूद केल्यास तो श्रेणीसुधार ऐवजी नियमित विद्यार्थी होईल असे प्रकरण निदर्शनास आल्यास मंडळास चुकीची माहिती सादर केल्याबाबत नियमानुसार कनिष्ठ महाविद्यालयाविरुध्द गंभीर कारवाई करण्यात येईल.

**तुरळक विषय घेऊन प्रविष्ठ होणाऱ्या (Isolated) विद्यार्थ्यांसाठी विशेष सूचना**

1. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा किंवा इतर कोणतीही समकक्ष परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारास, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस किंवा तर कोणत्याही समकक्ष परीक्षेस जो / जे विषय घेतला नसेल / घेतले नसतील तो/ ते विषय घेऊन परीक्षेस आयसोलेटेड योजनेअंतर्गत प्रविष्ठ होता येईल.
2. अशा उमेदवारास त्याने परीक्षेत घेतलेल्या स्वतंत्र (Isolated) विषयात / विषयांमध्ये त्याने मिळविलेल्या गुणांचे गुणपत्रक देण्यात येईल. अशा गुणपत्रकात फक्त विषयातील संपादित गुण नमुद केले असतील. परंतु उत्तीर्ण / अनुउत्तीर्ण असा निकाल किंवा गुणांची टक्केवारी दर्शविण्यात येणार नाही.
3. सदर उमेदवार कोणतेही प्रमाणपत्र किंवा पारितोषिक, क्रीडा सवलतीचे गुण, किंवा शिष्यवृत्ती मिळण्यात पात्र असणार नाही.
4. **उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस किंवा इतर कोणत्याही समकक्ष परीक्षेस यापूर्वी प्रविष्ठ असलेल्या विषयास आयसोलेटेड योजनेअंतर्गत प्रविष्ठ होता येणार नाही याची नोंद घ्यावी**.

**अन्य महत्वाच्या सूचना**

1. विद्यार्थ्याचे आवेदनपत्र भरताना सुधारित विषय योजनेबाबतचा शासन निर्णय क्र. संकीर्ण 2019/प्र.क्र.243/19/एसडी-4 दिनांक 8 ऑगस्ट 2019 नुसारच विद्यार्थ्याने विषय घेणे आवश्यक आहे. या शासन निर्णयात नमूद केलेल्या विषय योजने व्यतिरिक्त विद्यार्थ्यांच्या आवेदनपत्रात चुकीच्या विषय योजनेनुसार विषय नमूद केल्यास विद्यार्थ्यांचा निकाल जाहीर केला जाणार नाही व विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीस कनिष्ठ महाविद्यालय प्रमुख जबाबदार राहतील.
2. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातर्फ विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र अपलोड तसेच, सर्व आवेदनपत्रांचे विहीत शुल्क अचूक भरणा करावे. विहित शुल्क भरल्याशिवाय संबंधितांचे प्रवेशपत्रे उपलब्ध करुन

दिली जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. जर मंडळात परीक्षा शुल्क जमा केल्याशिवाय विद्यार्थ्यास परीक्षेस प्रविष्ठ होवू दिल्याचे मंडळाच्या निदर्शनास आल्यास संबंधितावर मंडळ नियमानुसार कडक कारवाई केली जाईल याची नोंद घ्यावी.

3. आवेदनपत्र अपलोड केलेल्या विद्यार्थ्यांचे योग्यता प्रमाणपत्र (Eligibility Certificate), पुर्नपरीक्षार्थी (Repeater) विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका, श्रेणीसुधार (C.I.S.) विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका, तुरळक विषय (Isolated) विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकांच्या छायांकित प्रतीवर आवेदनपत्र क्रमांक नोंदवून विद्यार्थी प्रकारानुसार स्वतंत्र गठ्ठे प्रिलिस्ट सोबत वितरण केंद्रावर निश्चित केलेल्या दिनांकास जमा करावे.
4. ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेव्दारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी) घेवून प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांना मंडळाच्या दोन भाषा विषय व दोन श्रेणीचे विषय अनिवार्य आहे. त्यानुसार आवेदनपत्र ऑनलाईन पध्दतीने भरावे. तसेच भाषा विषयांची मौखिक परीक्षा व दोन श्रेणी विषयांची परीक्षा जवळच्या कनिष्ठ महाविद्यालयामार्फत घेवून सदर परीक्षेचे गुण/श्रेणी मंडळ कार्यालयात सादर करणे औद्यौगिक प्रशिक्षण संस्थेस बंधनकारक आहे.
5. **परीक्षा शुल्क जमा केल्याचे चलन, विद्यार्थी यादी व प्रिलिस्ट सोमवार दि.25/05/2026 रोजी आपल्या क. महाविद्यालयाच्या संबंधित वितरण केंद्रावर जमा करावयाचे आहे**.

**विभागीय सचिवांकरिता,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

प्रति,

प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय,
सातारा/सांगली/कोल्हापूर.

**<u>वितरण केंद्र प्रतिनिधींना सुचना</u>:-**

सर्व जिल्हा वितरण केंद्र प्रतिनिधींना कळविण्यात येते की, वरील सूचनेनुसार उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) जुलै-ऑगस्ट 2026 परीक्षेकरीता नियमित व विलंब शुल्कासह ऑनलाईन आवेदनपत्र भरलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रिलिस्ट, चलने आणि एक्सेल यादी तसेच पुनर्परीक्षार्थी, श्रेणीसुधार व तूरळक विषय घेऊन प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची यापुर्वीच्या परीक्षेच्या गुणपत्रिकांची छायाप्रत संबंधित क.महाविद्यालयाकडून जमा करुन घ्यावेत आणि कनिष्ठ महाविद्यालय सांकेतिक क्रमांक निहाय गठ्ठे करुन मंडळ कार्यालयात **<u>मंगळवार दि.26/05/2026</u>** रोजी जमा करावयाचे आहे. वितरण केंद्रावर स्वीकारण्यात आलेले सर्व साहित्य मंडळात जमा केले आहे याची खात्री करावी. **<u>परीक्षा प्राधान्य असल्यामुळे दिलेल्या निर्धारित मुदतीतच साहित्य जमा करण्यात यावे</u>**.

**प्रत महितीस्तव -**

1. मा. शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग कोल्हापूर
2. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), सातारा/ सांगली/ कोल्हापूर

## वितरण केंद्र प्रतिनिधींना प्रिलिस्ट स्वीकारणेबाबत सूचना

1) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी ) जुलै-ऑगस्ट 2026 परीक्षेकरीता ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्र भरलेल्या सर्व विद्यार्थ्यांच्या प्रिलिस्ट, चलने आणि एक्सेल यादी तसेच सर्व पुनर्परीक्षार्थी (Repeater), श्रेणीसुधार (Class Improvement) आणि तुरळक विषय घेऊन (Isolated) ऑनलाईन पध्दतीने आवेदन पत्र (Form) भरलेल्या विद्यार्थ्यांच्या यापुर्वीच्या इ.12 वी परीक्षेच्या गुणपत्रिकांची छायाप्रत Application number नोंदवून आवेदन पत्रासोबत सादर करणे बंधनकारक आहे. सदर विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेच्या छायाप्रती सोबत सादर न केल्यास प्रिलिस्ट वितरण केंद्रावर स्वीकारु नयेत. संबंधितांना विभागीय मंडळाशी संपर्क करण्यास सांगावे.
2) ऑनलाईन आवेदनपत्र भरलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रिलिस्ट, चलने आणि एक्सेल यादी तसेच पुनर्परीक्षार्थी, श्रेणीसुधार व तूरळक विषय घेऊन प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची यापुर्वीच्या परीक्षेच्या गुणपत्रिकांची छायाप्रत कनिष्ठ महाविद्यालय सांकेतिक क्रमांक निहाय गठ्ठे करुन घेवून यावेत.
3) दि.26/05/2026 रोजी मंडळ कार्यालयात येताना फेब्रु-25 व जून-जुलै-25 प्रमाणपत्र वाटप केल्याच्या पोहोच सोबत घेऊन याव्या.

## उच्च माध्यमिक कनिष्ठ महाविद्यालयांना सूचना

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) जून-जुलै 2026 परीक्षेकरीता ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्र भरलेल्या सर्व विद्यार्थ्यांच्या प्रिलिस्ट, चलने आणि एक्सेल यादी तसेच सर्व पुनर्परीक्षार्थी (Repeater), श्रेणीसुधार (Class Improvement) आणि तुरळक विषय घेऊन (Isolated) ऑनलाईन पध्दतीने आवेदन पत्र (Form) भरलेल्या विद्यार्थ्यांच्या यापुर्वीच्या इ.12 वी परीक्षेच्या गुणपत्रिकांची छायाप्रत Application number नोंदवून आवेदन पत्रासोबत सादर करणे बंधनकारक आहे याची नोंद घ्यावी. सदर विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेच्या छायाप्रती सोबत सादर न केल्यास प्रिलिस्ट स्विकारल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.